GOLDEN RESEARCH THOUGHTS


ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052 (UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 1 | JULY – 2021

# अनुदानीत शैक्षणिक संस्थांमधील महिला कर्मचाऱ्यांच्या आर्थिकस्थितीचे अध्ययन :परभणी जिल्हा एक विशेष अभ्यास

डॉ. संजीवकुमार एस. अग्रवाल [१], प्रा. सौ. व्ही. भूतडा [२]

[१]प्राध्यापक व वाणिज्य विभाग प्रमुख तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगाव जि.हिंगोली
[२]अधिव्याख्याता वाणिज्य विभाग कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गगाखेड जि. परभणी.

## प्रस्तावना–



आजच्या युगात व्यक्तीच्या जीवनात आणि सर्वांगिण विकासात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व आहे. व्यक्ती ही आयुष्यभर विद्यार्थी दशेतून काही शिकत असते. म्हणजे प्रत्येक व्यक्ती ही आयुष्यभर विद्यार्थी असतो. या विद्यार्थी दशेततो औपचारीक व अनौपचारीक काही ना काही शिकत असतो. अनौपचारीक शिक्षण हे अनुभवातून व समाजातून मिळत असतेतर औपचारीक शिक्षण हे शैक्षणिकसंस्थेतून घ्यावे लागते.

स्त्रीला सर्व प्रकारचे स्वातंत्र्य नाकरणाऱ्या समाजाने लेखन व वाचनाचीही मुभा पुर्वी ठेवलेली नव्हती. स्वातंत्र्यानंतर मात्र स्त्रियांना शिक्षणाची दरवाजे मोठ्या प्रमाणात उघडली गेली. शिक्षणामुळे स्त्रिया शिक्षण, नोकरी, व्यवसाय , समाजकारण, राजकारण अशा क्षेत्रातहळूहळू पुढे येतांना दिसून आल्या. पूर्वी समाजात शिक्षणासाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी बाहेर जाण्यास परवानगी नव्हती व नोकरीसाठीतर मुळीच परवानगी मिळत नव्हती मात्र आजच्या सद्यस्थितीचा विचार केलातरस्त्रीही स्वतःच्या पायावर उभी राहून विविध क्षेत्रात काम करत असल्याचे दिसते. प्रत्येक महिला पुरूषाच्या खांद्याला खांदा लावून काम करत असतांना दिसत आहेत.

महिला कर्मचारी म्हणून विविध क्षेत्रामध्ये काम करून स्त्रिया आपल्या कुटुंबाचा एक आधारस्तंभ म्हणून पुढे आल्या आहेत. कुटुंबाच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठीतसेचसमाजाचेऋण फेडण्यासाठी आणि राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी ज्ञानदानाचे कार्य करतांना बऱ्याच महिला दिसतात. अध्यापनाचे कार्य करून कुटूंबाचा सांभाळ व इतरही जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडणाऱ्या स्त्रिया स्वतःचे अस्तित्व निर्माण करीत आहेत. नोकरी करत असतांना स्त्रियांना वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागते. आणि त्यातल्या त्यात अध्यापनाचे कार्य करणाऱ्या व्यक्तीकडे समाज आदराने पाहतो. स्त्रियांचा अभ्यास हे केवळ एक सामाजिक शास्त्राचा भाग नसून एकीकडे स्त्रियांच्या दर्जाविषयी स्पष्टीकरण देऊ पाहणारेतर दुसरीकडेत्यांची असमानता घालवण्याचे उपाय आणि त्यांच्या सक्षमीकरणाच्या पध्दती सूचविणारे अध्ययन आहे. स्त्री अभ्यास हास्त्री व पुरूषामध्ये जागरूकता आणतो. विकास कामाचे नियोजन व धोरण निर्धारकांना धोरण निर्णयात स्त्री सहभाग व स्त्री भूमिका समजून घेणे आवश्यकठरते. एकूणचस्त्रियांचे प्रश्न व त्यांची भूमिका समजून घेणे व त्यांचे विश्लेषण स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टिकरणातून महत्वाचे आहे.

**संशोधन विषयाची उद्दिष्टये**

१) महिलांचेसमाजातील स्थान अभ्यासणे.
२) संशोधन विषयक साहित्याच्या पुनरावलोकनाचा अभ्यास करणे.
३) परभणी जिल्ह्याची आर्थिक व सामाजिकस्थिती अभ्यासणे.
४) महिलांच्या नोकरीमुळे कुटुंब व समाजामध्ये झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.
५) परभणी जिल्ह्यातील अनुदानीत शैक्षणिकसंस्थामधील महिला कर्मचाऱ्यांच्या आर्थिकस्थितीचे अध्ययन करणे.
६) शैक्षणिक क्षेत्रात नौकरी करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक समस्या अभ्यासून योग्य त्या उपायोजना सूचविणे.

**संशोधन विषयाची गृहितके**

१) महिलांच्या नोकरीमुळे एकूणच कुटूंब पध्दतीत बदल झाला आहे.
२) पूर्वीच्या तुलनेत, सद्यस्थितीत शिक्षण क्षेत्रातस्त्री व पुरूष खांद्याला खांदा लावून समान काम करत असल्याचे दिसून येते.
३) महिलांना नोकरी करत असतांना विविध सामाजिक व आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते.

**महिलांचेसमाजातील स्थान**

मराठवाडा शिक्षणाच्या बाबतीत पूर्वीपासून मागासलेला असलेला दिसून येतो. अलिकडील काळात यामध्ये थोड्या फार प्रमाणात सुधारणाहोत असतांना दिसून येतात. पण मराठवाड्यातील काळी कसदार जमीन असलेला परभणी जिल्हासाक्षरतेच्या बाबतीत बराच मागे आहे आणि त्यातहीपुरूषांचीसाक्षरताही स्त्रियांच्या साक्षरतेपेक्षा कितीतरी जास्त आहे. याचा अर्थ स्त्रियांचा आजही जेवढा पाहिजे तेवढा शैक्षणिक विकास झाला नाही.

पण मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंडाच्या सुरूवातीचा विचार करता स्त्रियांच्या शिक्षणाचीस्थिती निश्चितीचस्पृहणीय आहे. परभणी जिल्हाही याला अपवाद नाही. मागास समजल्या जाणाऱ्या परभणी जिल्ह्यात स्त्रियांनी शिक्षणाच्या बळावर आपले कर्तृत्व आणि क्रियाशिलता सिध्द करून वेगळा ठसा उमटविला आहे. पूर्वीच्या तुलनेत आधुनिक युगात स्त्रियांचा विविध क्षेत्रातसक्रीय सहभाग व समाज आणि अर्थव्यवस्थेच्या प्रगतीतील वाटा हासाततत्याने वाढत आहे. परभणी जिल्ह्यातील ज्या महिला अध्यापिका किंवा शिक्षण क्षेत्रात कार्य करतात त्या महिलांना समाजात एक विशिष्ट स्थान लाभलेले दिसून येते. त्यांचा सामाजिक व आर्थिक विकासही झालेला असतो.

**अनुदानीत शैक्षणिकसंस्थामधील महिला कर्मचा-यांच्या आर्थिक समस्या**

स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्यामुळे कौटुंबिक तणाव पैसाखर्च करण्याचे स्वातंत्र्य नाही,कुटुंबातील व्यक्तींच्या अपेक्षा, विभक्त कुटुंबात वाढ होते, मालमत्तेचेहस्तातंरणहोते,उच्च जीवनमानाची अपेक्षा,पुरुषप्रधान समाजात महत्वाच्या निर्णयाचे अधिकार पुरुषांकडेच असतात. महिला शिक्षिकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन समाजाचा व घरी राहणाऱ्या इतर स्त्रियांचा म्हणावा तितकासकारात्मक नाही. त्यामुळे त्यांना शाळा व महाविद्यालयात नोकरी करतांना तारेवरची कसरत करावी लागते.महिला शिक्षिकांना आपल्या घरच्या अनुउपस्थितीची भरपाई करण्यासाठी तिला अनेक उपाय योजावे लागतात. उदा. सुट्टिच्या दिवशी मुलांना भावनिक दृष्ट्या जास्त खाद्य पुरविणे, घरातीलसदस्यांची मर्जी राखण्यासाठी विशेष मेहनत घेणे. आपल्या व्यक्तीमत्वाला वेगवेगळा आकार देउन जो अनेकदा स्वभाव सुलभ नसतो.वाढती महागाई, उत्पन्नापेक्षा खर्च जास्त,परावलंबीलत्व ,कामाच्या बदल्यात दिले जाणारे वेतनइत्यादी समस्यांना महिलासामोरे जातांना दिसतात.

**अनुदानीत शैक्षणि ाकसंस्थामधील महिला कर्मचा-यांच्या सामाजिक समस्या**

वैवाहिक जीवनात असमाधान, वाढत्या महत्वाकांक्षामुळे तणाव, पत्नी विषयी संशयाची भावना ,मूलांकडे दुर्लक्ष, कुटुंबाकडे दुर्लक्ष, सासु सास-याशी संघर्ष, घटस्फोटाची समस्या, नोकरीच्या ठिकाणी समस्या, महिला शिक्षिकांना नोकरीच्या गावात राजकीय नेते व गावातील गटबाजीचा त्रास सहन करावा लागतो. महिला शिक्षिका किंवा नोकरी करणाऱ्या इतर महिलांमध्ये आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. त्यामध्ये प्रामुख्याने ताण, निरूत्साह, डोकेदुखी, भुकेचा आभाव, झोप न येणे, पाठदुखी, अनियमित मासिक पाळी इत्यादी समस्यांना महिलासामोरे जातांना दिसतात.

**महिलाकर्मचा-यांच्या समस्येवरील उपाययोजना**

१) प्रत्यक्ष शाळा किंवा महाविद्यालयामध्ये आवश्यकसोईस्त्रियांसाठी शासनाने उपलब्ध करुन द्याव्या. उदा. वाहनांची सोय, गृह, ग्रंथालय, शौचालय इत्यादी.
२) लैगीक शोषणाचे कायदेसरकारने पर्याप्त करावे जेणेकरून महिला शिक्षिकांनासंरक्षण मिळेल.
३) स्त्रीशिक्षणाला राज्यात अधिक गती येण्याच्या दृष्टिने शिक्षण संचालनालयात स्त्रीशिक्षणाचे काम पाहण्यासाठी स्वतंत्र विभाग सुरू करण्यात यावा.
४) शाळेमधूनस्त्री शिक्षिकांच्या नेमणूक मोठ्या प्रमाणावर कराव्यात. यासाठी जरूरत पडल्यास वयाची अट शिथिल करावी.
५) महिला शिक्षिकांचे प्रमाण वाढविण्यासाठी त्यांना नोकरीत असलेल्या आरक्षणाची मर्यादा वाढवावी यामुळे महिलांचासहयोग अल्पशः असता

**निष्कर्ष**

काम करणाऱ्या किंवा नोकरी करणाऱ्या महिला जरी आर्थिकदृष्टया सक्षम बनल्या तरी कुटुंबात स्वतःला त्या दोषी मानतात. त्यांचे म्हणणे असे असते की, नोकरीच्या ठिकाणी आयुष्यातला भरपूर वेळ जातो तेंव्हा कुटुंब, मुलांकडे त्यांना देण्यासाठी वेळ अपूरा पडतो मुलांच्या दृष्टिने किंवा नवऱ्याच्या दृष्टीने कुटुंबापेक्षा नोकरी महत्वाचे असल्याचे तिच्या निदर्शनास आणून दिले जाते. त्यामुळे कधी-कधी त्यांना नैराश्य येते. शिक्षणाचा उपयोग केवळ घर सांभाळणे, कुटूंबाची जिम्मेदारी घेणे एवढाच का ? पुर्वीही शिक्षण न घेता ह्या जबाबदाऱ्या महिलासक्षमपणे पार पाडतहोती. शिक्षणाचा उद्देश कुटूंब सांभाळणे एवढाच असेलतर त्याला शिक्षण म्हणावे का ? अशा प्रकारचे प्रश्न महिलांच्या डोक्यात घोंगावतांना दिसतात. यातून कधी-कधी शिक्षणाबद्दलही अनास्था निर्माण होते.

**संदर्भ सूची :**

1) Mangal Santosh (1991), 'Role Conflict Among Working Women in Teaching Profession.' Council for Social Development.
2) A.M. Sultana, Northirdawati M. Zahir, Norzolon. H.Yaacob (2014), 'Women in the Teaching Profession : Impacts and Challenges" International Journal of humanities and Social Science Vol-8 No. 6.
3) Naik S.P. (2008), 'Education for the Twenty first century', Anmol Publication, New Delhi.
4) डॉ. पी.व्ही.काटे. १९९९ 'मराठवाडयाचा इतिहास', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
5) Primary data